# प्रतिज्ञापत्र

"बेरड व आक्रोश" या आत्मचरित्रांचा अभ्यास" या विषयावरील प्रबंध मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल, (मराठी) या पदवी परीक्षेसाठी लिहिला आहे. हा प्रबंध अथवा त्यातील कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही व कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही. तसेच माझे संशोधन काम ही स्वतंत्र निर्मिती असून माझ्या माहितीप्रमाणे शिवाजी किंवा अन्य कोणत्याही विद्यापीठात या विषयावर प्रबंध सादर झालेला नाही.

बा. सं. चव्हाण

अभ्यासक

प्रा.श्री.बाळासाहेब संतू चव्हाण

छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा

# प्रस्तावना

आपला भारत देश इ·स· 1947 मध्ये स्वतंत्र झाला· स्वातंत्र्यानंतर सामाजिक परिवर्तन घडू लागले· यामुळे शिक्षणाच्या अनेक सुविधा जाहीर केल्या गेल्या· शिक्षणाची दरवाजे सर्वांच्यासाठी खुली झाली· पिढयान-पिढया अंधारात रखडत पडलेल्या लोकांना ज्ञानाचा प्रकाश मिळू लागला· इतर जातीतील मुलांच्या बरोबर दलित वर्गातील मुलांनाही शिक्षणाच्या सुविधा मिळू लागल्या· हे जर कशामुळे घडले असेल तर डॉ·बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार प्रणालीमुळे· त्यामुळे दलित समाजाची अस्मिता जागी झाली· त्यातूनच एक शिकेलेला वर्ग निर्माण झाला· याच वर्गातील लोकांनी आपल्या हातात लेखणी घेतली आणि दलित साहित्य लिहू लागले·

इ·स· 1960 नंतरच्या काळातच ख-या अर्थाने दलित साहित्याचे रोप लागले गेले· त्यातूनच दलितांनी आपले मनोगत, आपल्या व्यथा, आपले दुःख, दारिद्रय, अन्याय व वेदना मांडण्यास सुरूवात केली· ते सर्व समर्थपणे समाजापुढे मांडू लागले· काहींनी त्यासाठी कवितेचा आधार घेतला तर काहींनी कथेच्या माध्यमातून आपले दुःख मांडायला सुरूवात केली· तर काहींनी आत्मकथनामधून आपल्या व समाजाच्या व्यथा, वेदना व दारिद्र्याचा भोग मांडायला सुरूवात केली·

हा जो आत्मकथनाचा विषय मी निवडलेला आहे त्या मागची भूमिका स्पष्ट करण्यापूर्वी माझी भूमिका या ठिकाणी स्पष्ट करत आहे· तसे पाहता माझे शिक्षण भयानक हलाखीतून झाले आहे· जात नंदिवाल्याची· पोटाच्या उदरनिर्वाहा साठी आज इथं तर उद्या दुस-याच ठिकाणी· आमचा व्यवसाय सुया, दोरे, बिबे, काळे मणी विकणे· नंदिबैलाचे पाय उपाशी पोटावर घेवून लोकांचे मनोरंजन करणे· या मोबदल्यात जुनी कपडे, भाकरी व धान्य मिळत· अजूनही ही परंपरा माझ्या घरात आहे· वाकाच्या रशीने ताणलेल्या पालात तीन दगडाची चूल मांडून त्यावर स्वयंपाक, त्याच

पालात आम्ही आमची परंपरा आम्ही जोपासत असत. अजूनही माझ्या आईच्या डोक्यावरील सुया, दोरे, बिबे व काळेमणी विकण्याचा बुट्टा गेलेला नाही. तेव्हा पोटासाठी उन्हा-पावसात वणवण भटकंती करावी लागत. यातूनच माझे इयत्ता दुसरीपासून ते इयत्ता दहावी पर्यंतचे शिक्षण आश्रम शाळेत झाले. त्यानंतरचे शिक्षण कला व वाणिज्य, महाविद्यालय, आष्टा येथे बाहेरचे काम करून 11 वी, 12 वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. 12 वी नंतर महावीर महाविद्यालय, कोल्हापूर येथे दोन महिने बी.एड्. चा कोर्स करून आर्थिक परिस्थिती नसल्याने तोही कोर्स सोडून दिला. त्याच वर्षी लगेच बी.ए. भाग - 1 साठी छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे प्रवेश घेतला. पण अशा या शहराच्या ठिकाणी रहाण्याचा व जेवणाचा प्रश्न मला सतत भेडसावत राहिला. तेव्हा या कारणास्तव प्रवेश रद्द करण्याचे मी ठरविले होते. या संदर्भात अधिक्षक भारत श्रीपती शिंदे यांची भेट घेतली. माझ्या परिस्थितीचा विचार करून मला मुलांचे शासकीय वसतिगृहात प्रवेश दिला. जर का अधीक्षक भारत शिंदे मला भेटले नसते तर माझे शिक्षण झाले नसते. आजही माझ्या हातात नंदिबैलाचा कासरा धरून नंदिबैलांचे पाय उपाशी पोटावर घेवून लोकांचे मनोरंजन करण्यातच माझे आयुष्य बरबाद झाले असते. ख-या अर्थाने जर सांगावयाचे झाले तर माझ्या आयुष्याला कलाटणी याच मुलांच्या शासकीय वसतिगृहात मिळाली. तेही अधिक्षक भारत शिंदे यांचेमुळे, याच वसतिगृहात राहून अधीक्षक भारत शिंदे यांच्या सहकार्याने मुला-मुलींचे वार्षिक स्नेहसंमेलन, कवि संमेलन प्रत्येक वर्षी घेत होतो. एवढेच नव्हे तर मुला मुलींच्या कला गुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्यासाठी 5 जानेवारी 1990 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विशेषंकाची स्थापना करून प्रत्येक महिन्यातून एक अंक काढला जात होता. आजही तो विशेषांक सुरू आहे. अशा या मुलांचे शासकीय वसतिगृह, सातारा येथे राहूनच मी. बी.ए. भाग 1 ते एम.ए., एम्.फिल. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. आता सध्या मी प्राध्यापक म्हणून रयत शिक्षण संस्थेचे कला व विज्ञान महाविद्यालय, सावळज, ता. तासगांव, जि. सांगली येथे काम करीत आहे. सौ. इंद्रजिता बाळासाहेब चव्हाण याही रयत शिक्षण संस्थेच्या पंडित नेहरू विद्यालय, हिंगणगांव बु।। ता. खानापूर, जि. सांगली येथे इंग्रजी विषयाच्या उपशिक्षिका म्हणून काम करीत आहेत.

ज्या ज्या वेळी काही ना काही मराठी साहित्य वाचत असताना व अभ्यास करीत असताना माझ्या मनात दलितां विषयी आपोआपच आपुलकीची भावना निर्माण झाली· पूर्वीच्या कालखंडाचा अभ्यास करत असताना दलितांना किती वाईट वागवले जात होते याची उदाहरणे वाचून माझ्या मनास खूप वाईट वाटत· त्यांना रस्त्याने जाताना आपली पावले उमटलेली झाडावी लागत· रस्त्यावर तर थुंकण्याची सोयच नव्हती· त्यासाठी गळ्यात मडके व हातात खराटा घेऊनच बाहेर पडावे लागत असे· याच दलितांना पाण्यासाठी विनवणी करावी लागत होती· सवर्ण वर्ग त्यांच्या कडून कष्टाची कामे दिवस-रात्र करून घेत पण त्याचा मोबदला त्यांना व्यवस्थित मिळत नसे· त्यांच्यावर कितीतरी अन्याय होत होते· त्यांना जीवन जगणे नकोसे वाटायचे· हे सर्व वाचत असताना माझ्या समोर नेहमी एक प्रश्न उभा राहतो· तो म्हणजे समाज किती हीन वृत्तीने त्यांच्याबरोबर वागत होता· त्यांच्याकडे थोडीसुध्दा माणुसकी नव्हती का? मनुष्यच मनुष्याशी असा का वागतो? अशाच प्रकारचा छळ रामोशी समाजातील लोकांचा होत असे· आणि सध्याही होत आहे· या लोकांना जीवन जगण्यापरीस मरण परवडते· पोलीसांच्या मारामुळे बेरड लोक मृत्यूमुखी पडत· पोटाच्या उदरनिर्वाहासाठी दारू विकणे, जंगलातील लाकडे विकून त्यावर आपली उपजिविका भागवत असत· या रामोशी समाजातील भयानक दारिद्रय, दुःख, वेदना व व्यथा तसेच त्यांच्यातील देवदासी स्त्रियांचे जीवन इत्यादीचे मिश्रण, डॉ·भीमराव गस्ती यांनी आपल्या "बेरड व आक्रोश" या आत्मचरित्रातून केलेला आहे· "डॉ·भीमराव गस्ती यांच्या "बेरड व आक्रोश" या आत्मचरित्रांचा अभ्यास" हाच विषय मी एम्·फिल पदवी परीक्षेसाठी निवडला आहे·

या लघुप्रबंधासाठी मला मदत करणारे बरेच जण आहेत· मला ज्या मार्गदर्शिका लाभल्या प्रा·डॉ·सौ·विमल केशवराव पाटील· त्यांनी तर मला सुरूवातीपासूनच खूप प्रेरणा दिली आहे· सातत्याने जागरूक राहून वरचेवर माझे लेखन वाचले· काय काय वाचले असे त्या मला नेहमी विचारत असत· मी नवीन काही तरी वाचले हे सांगण्यासाठी तर मला नेहमीच पुस्तकाकडे वळावे लागत होते· यातूनच हे माझे लिखाण पूर्ण करण्याची मला स्फूर्ती मिळाली· त्याच बरोबर प्राचार्य आर· डी· गायकवाड यांनी

मला खूपच मदत केली आहे. त्यांनी सातत्याने माझ्या लिखाणाची चौकशी करून मला प्रोत्साहन दिले. त्यामुळे मलाही मनापासून खूप आनंद वाटत होता. तसेच माझे गुरू प्रा. बी. डी. पाटील, प्रा. डॉ. सौ. नलिनी महाडीक, प्रा. डॉ. श्रीमती सुमन पाटील, प्रा. सौ. शकुंतला आढाव, प्रा. सुधाकर आढाव, प्रा. एस. पी. दाते यांनीही मला अचूक मार्गदर्शन केले.

प्राचार्य ई. जी. निकम, प्रा. सौ. सरलादेवी निकम, प्राचार्य अशोक महादार यांनी मला माझ्याकामात मदत केली. एम्. फिलचे सर्व लिखाण मुलांचे शासकीय वसतिगृह सातारा येथे राहून पूर्ण केले. या कामी अधीक्षक भारत शिंदे यांचे सहकार्य बहुमोल ठरेल. एवढेच नव्हे तर अधीक्षक भारत शिंदे हे आपल्या घरचे जेवणही देत. त्याच बरोबर त्यांच्या धर्मपत्नही सौ. नंदाताई भारत शिंदे या आपल्याच घरातील एक व्यक्ती आहे असे समजून त्यांनीही खूपच सहकार्य केले आहे. माझ्या या लिखाणास मदत करणारी माझी धर्मपत्नी सौ. इंद्रजिता बाळासाहेब चव्हाण यांनीही यात महत्वाचा वाटा उचलला आहे. त्याच प्रमाणे कु. संगिता आंधकर, कु. संगिता खुडे, प्रा. पोपट काटकर, कु. अनिता जगताप, उर्मिला माने, काशिनाथ पवार, संजय चौधरी, परबती कानडे, प्रा. कु. सुरेखा फडतरे, प्रा. टी. के. हातेकर, वाणी डी. के., कला व विज्ञान महाविद्यालयातील लेखनिक श्री. संजय पाटील, प्रा. रामराजे माने देशमुख, समाज कल्याण अधिकारी श्री. एन. एस्. निंबाळकर, अधिक्षिका श्रीमती सुशिला चव्हाण, प्रा. भगवान कदम, प्रा. दिपक वळवी व जिजाबा आवळे या सर्वांनी खूपच सहकार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. ल. रा. नसिराबादकर यांनीही मार्गदर्शन केले आहे. या सर्वांचा मी आभारी आहे. या सर्वांच्याबरोबर मदतीचा खारीचा वाटा उचलणारे सुरेश चव्हाण, परशराम चव्हाण, सर्जेराव चव्हाण, रंगराव देसाई व तुकाराम देसाई यांनीही मला खूप मदत केली. तसेच मला शिकण्याचे प्रोत्साहन देणारे माझे अज्ञान आई वडिल व भाऊ बहिण यांचाही मला या ठिकाणी उल्लेख करणे आवश्यक आहे.

या कामासाठी मला छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा, कला व विज्ञान महाविद्यालय, सावळज, ता. तासगांव, संत गाडगे महाराज महाविद्यालय, कराड,

शिवाजी विद्यापीठ ग्रंथालय, कोल्हापूर व मुलांचे वसतिगृह, सातारा येथील ग्रंथालय यांचेकडून संदर्भ ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके इत्यादी साहित्य मिळाले· या सहकार्याबद्दल मी त्यांच्या प्रमुखांची व सेवकांचा अत्यंत आभारी आहे·

"बेरड व आक्रोश" या आत्मचरित्राचे लेखक डॉ·भीमराव गस्ती यांनीही मला वेळोवेळी या कामात मदत करून बेरड समाजातील लोकांच्या व्यथा, दुःख, दारिद्र्य, अन्याय व देवदासी स्त्रियांवरील अन्याय याविषयी माहिती दिली· तेव्हा अशा या सामाजिक कार्यकर्त्यांचा मी ऋणी आहे·

आत्मकथनपर कौतुक होणा-या मराठी साहित्याच्या दालनात मला जे वाटते तेच मनमोकळेपणाने माझीही थोडीशी आत्मकथा प्रस्तावनेत मांडली· कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था स्थापन करून अनेक दीन-दलितांना शिक्षणाचे दालन खुले करून दिले· त्यामुळे माझ्या सारख्या अनेक रयत सेवकांनी आपले शिक्षण पूर्ण केले· त्यामुळेच माझा आत्मविश्वास वाढला· विमुक्त भटक्या जमातींच्या व्यथा, वेदना, दुःख, दारिद्र्य, अन्याय व देवदासी स्त्रियांचे जीवन इत्यादी मराठी साहित्यात नोंद केले जावे म्हणनू मी "डॉ·भीमराव गस्ती यांच्या "बेरड व आक्रोश" या आत्मचरित्रांचा अभ्यास" या विषयावर एम्·फिल· साठी लघुप्रबंध लिहिला आहे·

या प्रबंधाचे अत्यंत तत्परतेने टंकलेखन व बांधणी करून देणारे "रिलॅक्स सायक्लोस्टायलिंग सातारा" चे श्री·मुकुंद ढवळे आणि त्यांचे सहकारी सुशीलकुमार कांबळे व राजू कुलकर्णी यांचाही मी आभारी आहे·

प्रा· बाळासाहेब संतू चव्हाण
कला व विज्ञान महाविद्यालय,
सावळज, ता·तासगांव, जि·सांगली·